Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *GoldenResearch Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# महाराष्ट्राच्या जडणघाणीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक योगदान

**महादेव रावसाहेब मुंडे**
राज्यशास्त्र विभागपी.व्ही.पी कॉलेज पाटोदा.

***सारांशः*** महाराष्ट्राच्या जडणघडणीत वेगळे स्थान निर्माण करुन देशाच्या राजकारणात आपले प्रभूत्व प्रस्थापित करणारे प्रभावशाली नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. यशवंतरावांचे स्वतंत्र्य चळवळीतील महाराष्ट्राच्या जडणघडणेतील आणि देशाच्या संरक्षण मंत्रालयाला स्वकर्तृत्वातू दिलेले योगदान आज ही दिशा दर्शक आहे हे महाराष्ट्रास काय देशाच्या ही संम्रतीत ठेवणारे आहे.

## प्रस्तावनाः

राजकीय क्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्र्ये बोटावर मोजावीत इतकीच आहेत किंबहुना लिहिलीचतर बव्हंशी आयुष्याच्या उत्तरार्धात लिहीलेली आहेत. स्वर्गीय यशवंतरावांचे नाव देशाच्या राजकारणात, समाजकारणातच नव्हेतर मराठी साहित्यीक म्हणून त्याची ओळख आहे. यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीच्या निघडीत कार्यामध्ये सक्रिय होत त्यांची राजकीय वाटचाल खऱ्या अर्थाने 1946 च्या निवडणुपिासून सुरु झाली ते मुंबई विधीमंडळाचे प्रतिनिधी होऊन त्यांनी मोरारजी देसई गृहमंत्री आलेल्या खात्याचे संसदीय सचिव म्हणून काम केले.1952 च्या निवडणूकी नंतर मोरारजी देसाईच्या मंत्रीमंडळामध्ये राज्यमंत्री म्हणून त्यांचा समावेश करण्यात आला. 1 नोव्हेंबर 1956 ला मुंबई राज्य हे व्दैभाषिक राज्य आस्तीत्वात आले व या राज्याचे मुख्यमंत्री झाले. यशवंतराव चव्हाणांचा स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात बरीच वर्षे प्रभाव राहिला, त्यांच्या राजकिय जीवनातला 1956 ते 1969 हा कालखंड सर्वात याशस्वी समजला जातो.

मुंबई व्दिभाषिक राज्य निर्माण होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीचे समाधान झाले नाही, समितीच्या नेत्यांनी अंदोलन अधिक प्रखर केले या परिस्थितीचे त्यांनी सामंजस्याची भूमिका घेवून शासनातील दुरावा उत्तरोत्तर कमी करण्याचा प्रयत्न केला."संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रीय नेतृत्वाला पटवून देण्यात काही काळाने यश प्राप्त झाले. 4 डिसेंबर 1959 रोजी व्दिभाषिकाचे विभाजन करण्यांचा ठराव केला. पंडीत नेहरुंनी मराठी भाषीक महाराष्ट्रराज्याच्या निर्मीतीला संमती दर्शवली व 1 मे 1960 रोजी मुंबई सह महाराष्ट्रराज्याची स्थापना झाली."[1]

1956 पासून 1962 पर्यंतच्या कारकिर्दीत यशवंतरावानी महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाचा पाया घातला अर्थरचना, शासनपध्दती, शिक्षणाचा विस्तार, आणि अर्थव्यवस्था सहकारी तत्वाच्या आधारे प्रस्थापीत करण्याकरता कायदेविषयक तरतुद केल्या. राज्याच्या विकासाचा पाया पक्का करण्यासाठी राजकारणा बरोबर शिक्षणाकडे ही लक्षकेंद्रीत केले शिक्षण हे सामाजिक परिवर्तन घडून आणनारे साधन आहे, या साधनाव्दारे व्यक्तींच्या सर्वांगीन विकासाला जसी चालना मिळते तसे व्यक्तीचे आचार, विचार, आणि संस्कार यामध्ये देखील वस्तुनिष्टता येते. शिक्षण ही समाजविकासाची प्रक्रिया आहे हा विचार समोर ठेवून यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाचे लोकउपोगी कार्ये केले.

यशवंतराव चव्हाण याचे शैक्षणिक विचार आत्यंत महत्वाचे आहेत त्यांनी राजकारणात राहून सामाजीक, शैक्षणिक व सहित्याची ही जोपासना केली. राजकारणा बरोबर त्यांनी सामाजीक जबाबदारी म्हणून शैक्षणिक प्रबोधना बरोबर मंत्री या भूमिकेतून शैक्षणिक विचाराला मुर्त रुप देण्याचे कार्ये केले. महाराष्ट्रात सामाजीक धोरणाचा शैक्षणिक धोरणावर प्रभाव आहे "महाराष्ट्राला वैचारिक, सामाजीक व राजकीय चळवळीचा मोठा वारसा लाभला आहे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोखले, रानडे, टिळक, आगरकर, राजर्षीशाहू, पंडित रमाबाई, महर्षी कर्वे, साने गुरुजी, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. पंजाबराव देशमुख अशा अनेक नामवंतानी समाजपरिर्वनाचे एक साधन म्हणून त्यावर भर दिला."[2] हाच वारसा खऱ्या अर्थाने चालवण्याचे कार्य यशवंतरवांनी केले.

महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्यापुर्वी महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर कशी असावी याचे विवेचन करताना यशवंतरावानी महाराष्ट्राला ज्या राजकीय, सामाजिक आणि आर्थीक प्रश्नांना तोंड देणे भाग आहे त्याची स्पष्ट कल्पना जनतेला करुन दिलेली होती.त्या प्रश्नांच्या मागे शैक्षणिक प्रश्न ही दडून बसलेले आहेत. ते ही चांगल्या प्रकारे सोडवता आले पाहिजेत त्यांनी शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा उलघडा करताना म्हणाले होते."आमच्या शिक्षणाची पध्दती कशी आसावी हा आमचा महत्वाचा प्रश्न आहे आजपर्यंत आम्ही ज्या तऱ्हेचे शिक्षण घेतले ते शिक्षण चांगले असेल योग्य ही असेल, परंतु त्यामुळे आमच्यात नोकरी पेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आम्हाला असे सांगण्यात येते की, आमची बुध्दीच आमचा पिंडच – नोकरी पेशाचा आहे. मला ही गोश्ट मंजूर नाही. "[3]नोकरीपेशाची मनोवृत्त्ती निर्माण करणारी शिक्षण पध्दतीच ही ब्रिटीशांनी निर्माण करुन साम्रज्याचा विस्तार व साम्रज्य चालवण्यासाठी केला आहे परंतु महाराष्ट्रातील काही व्यक्तींनी बुध्दी सामर्थ्यांच्या जोरावर देशात व राज्यातही कर्तुत्वाची छाप निर्माण केलेली आहे. म्हणून घेत असलेली शिक्षण पध्दती ही चुकीची आहे असे बोलणे ही योग्य ठरणार नाही परंतु यशवंतरावाना जी शिक्षण पध्दती आपेक्षीत होती ती म्हणजे महाराष्ट्राचा आर्थीक विकास घडवुन आणनारी शिक्षण पध्दती हवी होती. शैक्षणिक विचार व्यक्त करताना म्हणतात की, "फक्त आम्ही तांत्रिक शिक्षण, वेगवेगळया शास्त्रांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. या शिवाय ज्याला आपण निव्वळ हयुमॅनिटीचे शिक्षण म्हणतो अशा तऱ्हेच्या शिक्षणाचे महत्व आहेच. ते मुलभूत शिक्षण आम्हाला मंजूर आहे. आणि या शिक्षणाच्या बाबतीत शिक्षणाची सारीदारे सताड उघडी करुन ते खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे आमचे ध्येय असले पाहीजे मी तर असे म्हणेन की या तऱ्हेच्या शिक्षणाचे प्रकाशझोतात अगदी शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊ शकलो. तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की, त्याला कोणत्याही मेहेरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही तो स्वतःचे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करील"[4] या विचारावरुन महाराष्ट्र राज्याचे शैक्षणिक धोरणच व्यक्त केले म्हणावे लागेल कारण या विचारानूसार महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे ही प्रयत्न चाललेले आहेत. शिक्षण हे खालच्या स्तरापर्यंत उपलब्ध करुन दिले पाहीजे त्याचबरोबर त्यास तांत्रीक शिक्षणाची जोड असली पाहीजे कारण राष्ट्राला स्वालंबी बनविण्याचे एक प्रभावी माध्यम बनणे हेच शिक्षणाचे आजतरी प्रमुख उदिष्ट असू शकते हाच विचार यशवंतरावानी महाराष्ट्र राज्यनिर्मीती नंतर मंत्रीमंडळाच्या शपथविधी—प्रसंगी व्यक्त केला होता.

शिक्षण ही सर्व व्यापक संकल्पना आहे. शिक्षणामुळे परिवर्तन घढून येते म्हणून यशवंतराव चव्हाण म्हणतात "मला अशिक्षित बेकरांच्या फौजे पेक्षा सुशिक्षित बेकारांची फौज परवडेल कारण ते देशाचे प्रश्न समजाऊन घेऊन सोडविण्यास मदत करतील"[5] म्हणून त्याने सर्वांना शिक्षण मिळाले पाहीजे शिक्षण घेऊन बेकारांच्या फौजा निर्माण झाल्या तरी चालतील सुशिक्षित बेकार आणि अशिक्षित बेकार यामधला कोणता धोका चालेल तर तो सुशिक्षित बेकरांचा कारण सुशिक्षित बेकार हा सामाजिक, आर्थिक, राजकिय, प्रश्नांचे निदान विचार तरी करु शकतील, आपण बेकार का राहीलो याची ही कारणमिमांसा करतील, यातून बेक.ारी दुर करण्याचा प्रयत्न निश्चित होवू शकतो, तसेच सामाजिक समस्या निर्माण झाल्यास ते सोडविण्यासाठी शिक्षण कामी येईल. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शिक्षण हा मानवाचा मुलभूत हक्क असल्याने तो हक्क त्यांना प्राप्त करुन देणे म्हणजे सार्वत्रिक शिक्षण होय. सार्वत्रिक शिक्षणा बरोबर मोफत शिक्षण शासनाने द्यावे आणि जनते घ्यावे. अशा प्रकारे शिक्षण देण्यासाठी यशवंतरावानी प्रयत्न केले. सार्वत्रीक शिक्षण देण्यासाठी त्यांनी "आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत आणि मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती आणि ग्रामीण भागात शाळा महाविद्यालय काढण्यास चालना दिली हा त्यांच्या शिक्षण विषयक धोरणाचा मानबिंदू होता"[6]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना बौध्द धर्माची दीक्षा दिली ते हिन्दु धर्मातून बाहेर पडले त्यांना मागासवर्गीयांच्या म्हणजेच

अनुसुचित जाती म्हणून घटनेनुसार मिळत असलेल्या सवलती दयाच्या का? असा प्रश्न मंत्रीमंडळासमोर आला. त्यावेळी मंत्रीमंडळातील सर्व सदस्यांनी सवलती चालू ठेवण्यास विरोध केला. यावेळी यशवंतरावजीसह चारच सदस्य या सवलती पुढे चालू ठेवाव्या या मताचे होते. कारण धर्म बदल झाला म्हणून लगेच मागासपण गेले असे होत नाही आणि अकायदेशिर बंधन नसले तरी नैतीक आणि सामाजिक दृष्टयासवलती चालु ठेचणेच न्याय आहे. त्या बैठकीमध्ये विषय तहकुब करून मंत्रीमंडळाच्या दुसऱ्या बैठकीमध्ये निणर्य घेण्यात आला असाच दुसरा एक प्रसंग इ.बी.सी. सवलतीसाठीचा होता. दारिद्रयामुळे ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावं लागत अशा सर्व जाती धर्मातील गरीब बांधवांच्या मुलांना मोफत शिक्षण घावं असा एक प्रस्ताव समाजकल्याण विभागाच्या वतीने मंत्रीमंडळा समोर आला. कल्याणकारी राज्याचे एक पुरोगामी पाऊल म्हणून आम्ही अनेकांनी त्याचे स्वागत केले. परंतु तेवढाच कडाक्याचा विरोध काही दिग्गजांकडून झाला. यशवंतरावानी त्याची समजूत घालवण्याचा प्रयत्न केला पण उपयोग होईना त्यावेळी यशवंतरावांनी भूमिका घेतली की, ”गरीब बांधवांसाठी असलेली इतकी आवश्यक व पुरोगामी योजनाही आम्ही हाती घेऊ शकणार नसू तर हे मुख्यमंत्रिपद काय कामाचे? असे निर्वाणीचे उद्‌गार काढून ते बैठकीतून उठून गेले”[7]दबावाखाली का होईना हा निर्णय घेतला गेला. यशवंतरावानी आपले मुख्यमंत्री पद पणाला लावून ही योजना मंजूर करण्यात आली. या क्रांतीकारी योजनेमुळे बहुजन समाजाचा चेहरामोहरा बदलला. या योजनेचा लाभ घेवून ग्रामीण भागातील अनेक युवक मोठ मोठया पदावर जाऊन पोहचले काहीमंत्री, आणि मुख्यमंत्रीपदा पर्यंत जाऊन पोहोजले. अन्य राज्याने ही, या योजनेचा काही भाग घेतला एक योजना कशी शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवते हे यावरुन दिसून येते.

शिक्षणाची दारे सताड उघडी ठेऊन समाजातील सर्वांना, सर्व घटकांना त्याचा लाभ घेता यायला हवा असा सार्वत्रीक सुधारणावादी विचार यशवंतराव चव्हाण यांनी ऊराशी बाळगला होता. उच्च शिक्षणात ही मुठभर लोकांची मालकी प्रस्थापित होती कारण उच्च शिक्षण हे विद्यापीठाचा दर्जा टिकविण्यासाठी गुणवत्तेच्या आधारावरच शिक्षण दिले जावे, त्या आधारे पदविधरांची गर्दी ही रोकता येईल या भुमिकेला यशवंतरावांचा विरोध होता त्यांच्या मतानुसार “शिक्षण प्रसार म्हणजे शिक्षण विस्तार होय. कारण शिक्षणाचा विस्तार घडवून बहुजन समाजाला कुठल्याही स्तरावरचे शिक्षण नाकारले जाऊ नये.“8 आपल्या या विचारांना कृतिशीलतेची जोड देत उच्च शिक्षणात अनेक समाजोपयोगी निर्णय घेऊन अंमलबजानी करुन आणली त्या पैकी काही निर्णय पुढील प्रमाणे

1. औरंगाबाद व कराड येथे नविन आभियांत्रीकी महाविद्यालय सुरु केली.
2. नागपुरच्या सरकारी आभियांत्रीकी महाविद्यालयाला प्रादेशीक महाविद्यालयाचा दर्जा दिला.
3. महाराष्ट्रात विविध भागात महाविद्याल उघडण्याची परवाणगी दिली.
4. प्रादेशीक विकासाचे संतुलन साधण्याच्या भावनेने न्या. पळनीटकर समितीच्या शिफारशी नुसार औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ निर्माण केले तसेच मराठवाडयासाठी स्वतंत्र वैद्यकिय महाविद्यालयाची औरंगाबाद येथे स्थापना केली.
5. मराठवाडया प्रमाणेच 50 लाख रूपयांची तरतुद करुन कोल्हापुर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. ही यशवंतरावांची देण होय.

यशवंतरावांनी शिक्षणाबाबतचा उदात्त दृष्टीकोण समोर ठेऊन शैक्षणिक कार्य केले. “माणसाजवळ जे जे म्हणून चांगले असेल त्याचा गौरव झाला पाहीजे त्यासाठी बहुजन समाज सुशिक्षीत झाला पाहीजे अशी यशवंतरांवाची जिद्‌द्य होती. म्हणून ते नेहमी ठासून सांगत विद्येच्या मंदिरात कसलाही भेद असू नये. ज्ञानामृताची तहान प्रत्येकाला लागली पाहीजे, समाजवादी समाजरचनेत हे तत्व प्रामुख्याने मानले गेले पाहीजे.“[9]

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आज 70: जनता ही शेती व्यावसयावर आवलंबून आहे. पारंपारीक पध्दतीने शेती केल्यामुळे शेतकरी हा नेहमीच आडचणीत सापडतो त्यासाठी शेती ही तांत्रीक पध्दतीने करण्यासाठी कृषी शिक्षणाची ही आवश्यकता आहे. कृषी शिक्षणा संबंधी यशवंतरावानी आपले विचार व्यक्त करताना म्हणतात की,“मी हल्लीच्या शिक्षणाचा म्हणजेच ज्याला हयुमॅनिटीजचे शिक्षण म्हणतात त्याचा पुरस्कार करणारा आहे पण मी ज्या देवांचा भुंज आहे त्याच देवाची स्तुती करणार नाही. शेतांच्या शिक्षणाची ही आवश्यकता आहे शेतकरी आणि शेतीसंबंधी असणारा मनुष्य  हा शहाणा असल्या शिवाय शेती शहाणी होणार नाही, यावर माझा विश्वास आहे म्हणून शेती संबंधीचा शास्त्रीय दृष्टीकोन अगदी झोपडीतल्या शेतकऱ्यां पर्यंतनेऊन पोहवण्याची आवश्यकता आहे. आपली शेती शहाणी नाही, त्याचे कारण आपला शेतकरी शहाणा नाही शेतीचा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा व बिकट आहे की, त्याने भारताच्या जीवनातच एक प्रकारची ’ट्रजिडी’ निर्माण केली असे यशवंतरावाना वाटत होते. हा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी आधुनिक पध्दतीने शेती करण्याची आणि त्यासाठी शेतीच्या नवीन ज्ञानाची गरज आहे. शेती संबंधीचा नवा विचार केवळ कृषि शास्त्राच्या अभ्यासकापर्यंत मर्यादित ठेवून चालनार नाही वस्तुतः तो असा पाझारता किंवा न पाझरता अगदी सरळ कालव्यासारखे वाहत शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे”[10]हा विचार यशवंतरावांचा ग्रामीण जीवनाच्या पुर्नरचनेचा आहे. शेतीकरणाऱ्या शेतकऱ्याला प्रशिक्षण असले पाहीजे त्यासाठी महाराश्ट्र कृशी विद्यापोठे निर्माण करण्यात आली परंतु शेतकरी प्रशिक्षीत करणारी प्रशिक्षण त्यांना आजही मिळत नाही. त्यासाठी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्याला प्राथमिक स्तरापासून शेतीचे शिक्षण मिळणे गरजेचे आहे.

यशवंतराव चव्हान यांनी शैक्षणिक विचाराच्या सर्व व्यपक दृष्टोकोनातून महाराष्ट्राच्या शिक्षण व्यावस्थेला दिशा दिण्याचे कार्ये केले नोकरपेशाच्या शिक्षण पध्दतीला तं‌त्रकितेच्या शिक्षणाच्या जोडीची आवश्यकता सुशिक्षित युवकाच्या फौज निमीण झाल्या पाहिजेत स्त्री शिक्षणचेही धोरण स्विकारले उच्च्तशिक्षाण कृषी शिक्षणाची आवश्यकता मागसगीय दुर्लक्षीत समाजासाठी सर्वव्यापी शिक्षण सर्वाण मोफत शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला पाहिजे या सर्व त्यांच्या विचारातून महाराष्ट्राला दिशा देण्याचे तसेच ते विचार प्रत्याक्षत आणण्याचे कार्ये यशवंतराव चव्हाणने केल म्हणून यशवतराव चव्हाण हे माहराष्ट्रच्या जडण घडणीत शैक्षणिक योगदान ही मैलाचे ठरले आहेत.

***संदर्भ सुची :—***

1.सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र —संपादक प्रा. अशोक नाईकवाडे ज्ञानेश प्रकाशन नागेश्वरवाडी औरंगाबाद प्रकाशन24 जुलै 2010 पान, 52.
2.कित्ता — पान, 189
3.युगंधर नेते यशवंतराव चव्हाण — संपादक बा.ह. कल्याणकर आकांक्षा प्रकाशन,नागपूर दि. 25 ऑक्टोबर 2003 पान 124,125.
4.कित्ता — पान 125
5.यशवंतराव चव्हाण — डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील चैतन्य पब्लिकेशन नाशिक डिसेंबर 2000 पान 135.
6.कित्ता — पान 139.
7.कित्ता — पान 60.
8.महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण — संपादक डॉ. अशोक नाईकवाडे विद्याभारती प्रकाशन लातूर प्रथमावृत्ती जून 2012. पान 219
9.कित्ता — पान 223.
10.युगंधर नेते यशवंतराव चव्हाण —संपादक बा.ह. कल्याणकर आकांक्षा प्रकाशन,नागपूर दि. 25 ऑक्टोबर 2003 पान 130.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net